लाखनीच्या ठाणेदाराने सायकलने प्रवास करत नागरिकांसह विद्यार्थ्यांशी साधला संवाद >>पान 2

भंडारा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नुरुल हसन यांचे भंडारा वासियांना आवाहन व निर्देश >>पान 3

लोणार येथील वन जमिनीवरील आगीची सीआयडी मार्फत चौकशी करा >>पान 4

**सुविचार**

आपल्याला मिळालेल्या प्रत्येक क्षणाचे मोल करा.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 216 ■ गुरुवार, दि. 20 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



वर्षांनंतर सलमान खान-ऐश्वर्या रायच्या ब्रेकअपचं खरं कारण आलं समोर!

आतील पान

# भविष्यवेधी विकास आणि तंत्रज्ञानाधरीत नियोजन प्रक्रियेतील गतिमानतेसाठी 'महाटेक' संस्था उभारावी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश



दैनिक आपला विदर्भ

मुंबई/प्रतिनिधी : भविष्यवेधी विकास आणि नियोजन प्रक्रियेत गतिमानता आणून एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्टपूर्ततेला चालना देण्यासाठी राज्यातील भूस्थानिक तंत्रज्ञानाची आणि माहिती तंत्रज्ञानांची सांगड घालून व्यवस्था बळकट करण्यासाठी 'महाटेक' संस्थेची निर्मिती करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

भू स्थानिक तंत्रज्ञानासंदर्भात विधीमंडळातील कार्यालयात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. मुख्य वन संरक्षक रविकिरण गोवेकर यांनी यावेळी सादरीकरणाद्वारे भू स्थानिक तंत्रज्ञान आणि अवकाश तंत्रज्ञानाच्या प्रशासनातील वापरासंदर्भात केंद्र शासनाची स्वायत्त संस्था असलेल्या भास्कराचार्य राष्ट्रीय अवकाश अनुप्रयोग आणि भू-माहितीशास्त्र संस्था व महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अ‍ॅप्लिकेशन सेंटरसंबंधीचे सादरीकरण केले.

लोकाभिमुख, पारदर्शक प्रशासन आणि विकासात्मक गती वाढविण्यासाठी तसेच शासकीय विभागांची नियोजन प्रक्रिया, मालमत्ता व्यवस्थापन आदींसाठी भू स्थानिक माहितीची जोड देणे आवश्यक असून त्यासाठी अवकाश तंत्रज्ञानाचा (स्पेस टेक्नॉलॉजीचा) वापर करण्यासाठी 'महाटेक' ही संस्था महत्त्वाची भूमिका बजावेल. 'महाटेक'च्या उभारणीसाठी केंद्र शासनाची स्वायत्त संस्था असलेल्या भास्कराचार्य राष्ट्रीय अवकाश अनुप्रयोग आणि भू-माहितीशास्त्र संस्थेची (भास्कराचार्य नॅशनल इस्टिट्यूट फॉर स्पेस अ‍ॅप्लिकेशन अ‍ॅड जिओ इन्फॉर्मेटिक) सुरुवातीच्या काळात सल्लागार म्हणून मदत घ्यावी. महाटेक, माहिती तंत्रज्ञान आणि एमआरसॅक यांचे इंटिग्रेशन करून सर्व विभागांच्या समन्वयाने कामास गती देता येईल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

राज्यात महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अ‍ॅप्लिकेशन सेंटर (एमआरसॅक) ही संस्था कार्यरत आहे. राज्यातील नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन आणि देखरेख करण्यासाठी तसेच शहरी समाजातील विकास आणि बदलांसाठी अवकाश तंत्रज्ञानाचा वापर आणि अंमलबजावणी करण्याचे काम ही संस्था दीर्घ काळापासून करत असून या संस्थेकडे मोठ्या प्रमाणात डेटा आहे. मात्र, त्याचा योग्य उपयोग होण्यासाठी नागपूर व पुणे केंद्राचे सक्षमीकरण आणि बळकटीकरण करण्यात यावे. त्यासाठी या संस्थेसाठी नागपूर येथे स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच मुंबईमध्येही आधुनिक उपकेंद्र सुरू करावे, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले. राज्यात प्रधानमंत्री गतीशक्ती योजनेची व्याप्ती वाढविण्यासाठी गतीशक्तीचा वेगळा सेल नियोजन विभागात निर्माण करावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन नानुटीया, उद्योग विभागाचे सचिव पी. अन्बलगन आदी यावेळी उपस्थित होते.

## एमपीएससी परीक्षा यावर्षीपासून युपीएससीच्या धर्तीवर होणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

मुंबई/प्रतिनिधी : : सन २०२५ पासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा ह्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पद्धतीप्रमाणे डिस्क्रिप्टिव्ह स्वरूपात घेण्यात येईल. तसेच या स्पर्धा परीक्षांचे आणि मुलाखतीचे संपूर्ण वेळापत्रक तयार करून त्यानुसार त्या घेतल्या जातील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत सांगितले.

विधान परिषद सदस्य शिवाजीराव गर्जे, प्रवीण दरेकर आणि विक्रम काळे यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना मांडली होती, त्यास मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने १२ नोव्हेंबर २०२४ च्या पत्रान्वये ६१७ उमेदवाराची शासनास शिफारस केली होती. त्यातील कागदपत्रे तपासणीसाठी हजर ५४० उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात आली. महाराष्ट्रातील विद्यार्थी हा युपीएससी सोबत एमपीएससीची परीक्षा देत असतो. दोन्ही परीक्षेचा पॅटर्न वेगळा असल्याने तो आता एकसमान करण्यात येत आहे. त्याचबरोबर एमपीएससीला अधिक सक्षम करण्यासाठी नवीन पदे सुधारित आकृतीबंधाद्वारे मंजूर करण्याची कार्यवाही सुरू आहे. यापुढे वर्ग १, वर्ग २ आणि वर्ग ३ ची पदभरती अधिक गतीने करण्यासाठी आयोगाची पुनर्रचना केली जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# कंत्राटदाराने लावला जलजीवन मिशनच्या योजनेला चुना?

## अबब ९२ कामापैकी तब्बल २८ कामे एकाच कंत्राटदराला

### ➤ अनागोंदी कारभाराने वटारले जनतेचे डोळे

### ➤ अधिकाऱ्यांची तेरे भी चूप मेरी भी चूप




**मेहकर : गैरप्रकार करण्याची ही हद्द असते. मात्र, ही हद्द जलजीवन मिशन योजनेच्या कामात ओलांडली असल्याचे विदारक चित्र मेहकर तालुक्यात दिसून येत आहे.अनागोंदी कारभाराने जनतेचे डोळे मात्र वटारले आहेत. कोट्यावधी रुपयांच्या कामामध्ये अनियमित्यची हद्द ओलांडली असल्याने जनतेचा मात्र, विनाकारण बळी चालला आहे. जलजीवन मिशन योजनेअंतर्गत मेहकर तालुक्यात ९२ गावांमध्ये जलजीवन मिशन योजनेअंतर्गत कामे सुरू आहेत. या ९२ कामा पैकी तब्बल २८ कामे एकाच ठेकेदाराने घेतल्याने जनतेचे मात्र, डोळे वटारले आहेत. तर अधिकाऱ्यांच्या भ्रष्टवृत्तीनेही कळस गाठल्याचे विदारक चित्र समोर आले आहे. अधिकाऱ्यांनी तेरे भी चूप मेरी भी चूप अशी भूमिका घेतल्याने गावागावातील मायमाऊल्यांना रखरखत्या उन्हात पाण्यासाठी रानोमाळ भटकंती करण्याची वेळ आली आहे. हा एवढा अनागोंदी कारभार सुरू असताना वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या हा प्रकार लक्षात आला नाही का असा प्रश्न आता सर्वसामान्य जनता उपस्थित करीत आहे.**

मेहकर तालुक्यामध्ये एकूण जल जीवन मिशन योजनेअंतर्गत ९२ कामांना मंजुरात मिळालेली आहे. मात्र, या कामांमध्ये प्रचंड प्रमाणात अनियमितता झाली असल्याच्या प्रचंड तक्रारी आरोप प्रत्यारोप अशी एक ना अनेक प्रकार समोर आले आहे. एकाच कंत्राटदाराने तब्बल २८ कामे करण्याचा कंत्राट घेतल्याचा प्रताप समोर आला आहे. ९२ कामापैकी तब्बल २८ कामेही एकाच कंत्राकदाराने घेतल्यानंतर याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आक्षेप का घेतला नाही?,एकाच ठेकेदाराला एकाच वेळेस एवढी कामे देता येतात का ? हा प्रश्न आहे. एवढी कामे करण्यासाठी एकाच वेळी आर्थिक व मनुष्यबळ नियोजन काय? कामे करण्यासाठी यांत्रिकीकरणाची सुविधा आहे का ? कंत्राट घेतल्यानंतर एकही काम पूर्णत्वास न गेल्यानंतर संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे का लक्ष दिले नाही. असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत.९२ कामापैकी तब्बल २८ कामे एकाच कंत्राकदाराने घेत ३१ टक्के चा कामे करण्याचा हिस्सा उचलल्याने याबाबत मेहकर तालुक्यात आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे. याकडे संबंधित अधिकारी लोकप्रतिनिधी यांनी का दुर्लक्ष केले असा प्रश्नही उपस्थित होत आहे. कंत्राटदाराच्या या प्रतापाने मेहकर तालुक्यातील जनतेला रानोमाळ भटकंती करण्याची वेळ आली आहे. या कामाकडे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आपल्या ईमानाला राखून लक्ष दिले असते तर, या कामातील अर्ध्यापेक्षा जास्त कामे पूर्ण झाली असती. मात्र, अधिकारी, पदाधिकारी यांनी टक्केवारीचा प्रताप केल्याने मेहकर तालुक्यातील जलजीवन मिशन योजनेचा बट्ट्याबोळ वाजला आहे. अधिकारी पदाधिकाऱ्यांच्या या टक्केवारीच्या प्रतापात जनता मात्र विनाकारण होरपळली जात असल्याचे विदारक चित्र मेहकर तालुक्यात दिसून येत आहे.तालुक्यातील जलजीवन मिशन योजनेअंतर्गत करण्यात येत असलेल्या कामात होत असलेल्या प्रचंड गैरप्रकारच्या आकड्याने जनतेचे डोळे वटारले आहेत. गेंड्याची कातडी परिधान केलेल्या अधिकारी पदाधिकाऱ्यांना मात्र याचे काही सोयर सुतक नसल्याचे चित्र तालुक्यात दिसून येत आहे.



देविदास खनपटे
मुख्य संपादक

## गैरप्रकाराचीही हद्द ओलांडली

शासकीय कामे करताना बहुतांश कामात गैरप्रकार हा नेत्याचाच आहे. मात्र, गैरप्रकार करताना त्याची काही मर्यादा ठेवावी.अधिकाऱ्यांना लाखोंचा पगार तर कंत्राटदारांना यातून लाखोचे नफा मिळते. मात्र, शासकीय योजना ह्या अधिकारी पदाधिकारी व कंत्राटदार यांच्यासाठी भ्रष्टाचाराचे कुरण ठरत असल्याने अधिकारी पदाधिकारी ही व कंत्राटदार कामे करण्यापेक्षा शासकीय निधीला चुना लावण्याचे काम करीत असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. मेहकर तालुक्यात तर, जलजीवन मिशन योजनेच्या कामात भ्रष्टाचाराची गैरप्रकाराची हद्द ओलांडली आहे. ९२ कामापैकी तब्बल ३१ टक्के काम हे एकाच कंत्राटदाराने दिल्याने योजना जनतेसाठी राबवायची की कंत्राटदराला गब्बर करण्यासाठी असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## मानव मुक्तीचा सत्याग्रह

२० मार्च हा दिवस भारताच्या सामाजिक इतिहासाला कलाटणी देणारा दिवस आहे. कारण याच दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी रायगड जिल्ह्यातील महाड येथील चवदार तळ्यावर अस्पृश्यांना पाणी घेता यावे म्हणून सत्याग्रह केला. हा महाडचा सत्याग्रह, चवदार तळ्याचा सत्याग्रह किंवा मानव मुक्तीचा सत्याग्रह म्हणून ओळखला जातो. म्हणूनच २० मार्च हा दिवस भारतात सामाजिक सबलीकरण दिन म्हणून साजरा केला जातो. हा सत्याग्रह फक्त महाराष्ट्रालाच नाही तर जगाला प्रेरणा देणारा ठरला. पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. तिच्यावर सर्वांचा समान हक्क असताना त्या काळच्या जातीय व्यवस्थेने मुख्य स्त्रोतातून पाणी घेण्यास व रस्त्यावरुन जाण्यासही अस्पृश्यांना बंदी घातली. ४ ऑगस्ट १९२३ साली ब्राह्मणेतर पक्षाचे नेते सी के बोले यांनी मुंबई कायदे मंडळात एक कायदा पास करुन घेतला. त्यानुसार सरकारी खर्चाने बांधलेल्या व सुस्थितीत असलेल्या मालमत्तेवर म्हणजे पाणवठे, धर्मशाळा, बगीचे यावर सर्वांचाच म्हणजे अस्पृश्यांचा देखील अधिकार असेल. जानेवारी १९२४ साली महाडच्या नगरपालिकेने या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा ठराव केला. या ठरावानुसार नगरपालिकेने महाडचे चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले केल्याचे जाहीर केले. परंतु स्पृश्यांनी अस्पृश्यांना या तळ्यातून पाणी भरू दिले नाही. त्यामुळे अस्पृश्यांमध्ये धाडस आणि आत्मविश्र्वास निर्माण करू देण्यासाठी व त्यांचा हक्क त्यांना मिळवून देण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळ्यातील पाण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरवले. बाबासाहेबांनी १९ आणि २० मार्च या दिवशी महाडमधील कुलाबा येथे परिषद भरवली. या परिषदेचे अध्यक्ष स्वतः बाबासाहेब हे होते. या परिषदेस सुरेंद्र चिटणीस, संभाजी गायकवाड, अनंत चित्रे, रामचंद्र मोरे, गंगाधर पंत सहस्त्रबुद्धे हे दलितेतर व ब्राह्मण नेते उपस्थित होते. या परिषदेत अस्पृश्यतेचा धिक्कार करुन काही ठराव करण्यात आले ते असे १) स्पृश्यांनी अस्पृश्यांना आपल्या नोकरीत ठेवावे. २) स्पृश्य लोकांनी अस्पृश्य लोकांचे नागरिकत्वाचे अधिकार मान्य करावेत. ३) मृत जनावरे ज्याची त्याने ओढवित ४) स्पृश्यांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांना वार लावून जेवण द्यावे. याच परिषदेत असेही ठरले की सर्वांनी दुसऱ्या दिवशी म्हणजे २० मार्च रोजी महाडच्या चवदार तळ्यातील पाणी प्यावे. त्यानुसार दुसऱ्या दिवशी परिषदेस उपस्थित असणारे सर्व नेते व परिषदेस आलेले सर्व जण चवदार तळ्यावर गेले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वप्रथम या तळ्यातील पाणी ओंजळीने प्यायले. त्यावेळी स्त्री पुरुष ५००० लोक या परिषदेस व त्यानंतर चवदार तळ्यावर पाणी पिण्यासाठी आले. त्यातील पुरुष हे हातात काठी घेऊन आले होते. हातात काठी म्हणजे महार जातीच्या पुरुषाचे चिन्ह होते. चवदार तळ्याचे पाणी पिऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांना मुक्तीचा मार्ग दाखवला. पण, ही मानवतावादी घटना रूढीवादी स्पृश्य हिंदूंना सहन झाली नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर सरकारी बंगल्यात परत गेल्यावर जातीयवादी, सनातनी विचारांच्या लोकांनी गावात अफवा उठवली की, चवदार तळे बाटवल्यानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील जमाव विश्र्वेवश्र्वराच्या मंदिरात जाऊन मंदिरही बाटवणार आहेत. धर्म धोक्यात आल्याचे उच्चवर्णीय, सनातनी हिंदूंनी गावभर पसरवले त्यातून जातीयवादी उच्च हिंदूंचा एक घोळका हत्यारे, लाठ्याकाठ्या घेऊन सभास्थानी आला. त्यांनी सभेनंतर गावाकडे जाण्यापूर्वी जेवण करीत असणाऱ्या अस्पृश्यांना मारहाण केली. त्यांच्या जेवणात माती मिसळली. विश्र्वेवश्र्वराच्या मंदिरात प्रवेश करण्याचा कट रचला आहे अशी अफवा उठवल्यामुळे गावातील सनातनी हिंदूंनी सत्याग्रहासाठी आलेल्या लोकांवर हिंसा केली. परंतु , अहिंसा हे तत्व मानणाऱ्या आंबेडकरांनी अस्पृश्य सत्याग्रहींना सनानती हिंदूंविरुद्ध हिंसा करु नका असा आदेश दिला होता, त्यामुळे एव्हढी हिंसा होऊनही आणि प्रत्यक्षात स्थानिकांपेक्षा संख्येने जास्त असूनही काठीधारी अस्पृश्यांनी संयम बाळगला. अस्पृश्यांनी तळे बाटवले म्हणून सनातनी, जातीयवादी हिंदूंनी गोमूत्र टाकून ब्राह्मणांकडून तळ्याचे शुद्धीकरण करुन घेतले. पुढे महाडच्या नगरपालिकेने स्थानिकांच्या दबावाला बळी पडून अस्पृश्यांना चवदार तळे खुले करण्याचा ठरावही रद्द केला. त्यामुळे बाबासाहेबांनी २५ आणि २६ डिसेंबर रोजी रोजी महाड येथे परिषद घेण्याचे ठरवले. या परिषदेचा उद्देश स्पष्ट करताना डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, आतापर्यंत आम्ही या तळ्याचे पाणी पिऊ शकलो नाही किंबहुना आम्हाला पिऊ दिले नाही, आता आम्ही या तळ्याचे पाणी प्यायलो म्हणजे आमचे सर्व दुःख नष्ट होईल, आमची सर्व परिस्थिती सुधारेल, आमच्यावरील अन्याय कमी होईल असे काही नाही. हा सत्याग्रह म्हणजे केवळ एका मानवाने दुसऱ्या मानवाला समानतेने कसे वागवावे हे सांगण्याचा व सर्व मानवाला समानतेचा अधिकार आहे हे दाखवण्याचा प्रयत्न आहे. समतेची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी जगाच्या पाठीवर पिण्याच्या पाण्यासाठी केलेला हा एकमेव सत्याग्रह आहे म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेला हा सत्याग्रह मानव मुक्तीचा सत्याग्रह म्हणून ओळखला जातो.

# लाखनीच्या ठाणेदाराने सायकलने प्रवास करत नागरिकांसह विद्यार्थ्यांशी साधला संवाद

## मोबाईलचा योग्य वापर, मोठ्या पदावर कसे जायचे यासोबत आरोग्य हीच खरी संपत्ती चा दिला मेसेज

**दैनिक आपला विदर्भ**

**लाखनी/जिल्हा प्रतिनिधी :** पोलीस स्टेशन लाखनीचे ठाणेदार पोलीस निरीक्षक हृदयनारायण सत्यदेव यादव यांनी सकाळचे सायकलींग दरम्यान जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा पेंढरी येथे भेट देऊन विद्यार्थयांसोबत संवाद साधला.

दरम्यान विद्यार्थयांना पोलीस खात्याबाबत माहिती देऊन आपल्या दैनंदिन दिनचर्येत शिस्तीचे अनुसरण कसे करायचे याबाबत मार्गदर्शन करून त्यांना मोबाईलचा कमी वापर करून मोबाईलद्वारे होणाऱ्या फसवणूक व फ्रॉड कॉलबाबत माहिती दिली. विद्यार्थयांना शिक्षणाचे महत्व सांगून अभ्यास करून उच्च पदावर कसे जायचे व शिक्षणासोबतच निरोगी आरोग्य कसे राखायचे याबाबत सुध्दा मार्गदर्शन करून आरोग्याचे महत्व पटवून दिले. ठाणेदार या पदावरील अधिकारी यांनी अचानक भेट देऊन मार्गदर्शन केल्याने विद्यार्थी सुध्दा उत्साहीत झाल्याचे दिसून आले. यावेळी शाळेतील ११७ विद्यार्थी हजर होते. सदर प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री. रविन्द्र मस्के, सहायक शिक्षक गरपडे, डडेमल, येडेकर, मडामे, शिक्षिका अंजनाताई पिंपळशेंडे, तासिका शिक्षिका मते हे हजर होते.

पोलीस स्टेशन लाखनीचे ठाणेदार पोलीस निरीक्षक हृदयनारायण सत्यदेव यादव हे वयाचे ५६ व्या वर्षी सुध्दा नियमित सायकलींग करीत असून पोलीस स्टेशन लाखनी येथील कार्यभार स्विकारल्यापासून ते दैनंदिन कर्तव्यातून वेळ काढून आठवड्यातून किमान चार पाच दिवस नियमित ३५ ते ४० किलोमिटर पर्यंत सायकलने प्रवास करीत असतात. सायकल प्रवासा दरम्यान शेतकरी, गावकरी यांचेसोबत संवाद साधून त्यांचेकडून गावातील माहिती घेऊन त्यांचे समस्या जाणून घेऊन निराकरण करण्यासंबंधात मार्गदर्शन करतात.



## जालना शहरालगतच्या शासकीय जमिनीवरील अतिक्रमणाची सखोल चौकशी करणार– महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** जालना शहरलगत असलेल्या शासकीय जमिनीवर झालेले अतिक्रमण संदर्भात मा. उच्च न्यायालयात उपलब्ध असलेला पाठक समितीचा अहवाल उपलब्ध करून घेतला जाईल. या अहवालातील वस्तुनिष्ठ माहितीच्या आधारे या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत सांगितले.

जालना शहरलगत असलेल्या शासकीय जमिनीवर झालेल्या अतिक्रमणाबाबत सदस्य अर्जुन खोतकर यांनी लक्षवेधी उपस्थित केली होती.

मंत्री बावनकुळे यांनी सांगितले, या ठिकाणच्या जमिनींच्या व्यवहारात अनेक गुंतागुंत झाली असल्याने उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार पाठक समिती स्थापन करण्यात आली होती. समितीने अहवाल मा. न्यायालयात सदर केला आहे. हा अहवाल विभागीय आयुक्तांनी मा. न्यायालयातून उपलब्ध करून घ्यावा.

मंत्री बावनकुळे यांनी सांगितले, या प्रकरणाची चौकशी पूर्ण होईपर्यंत या ठिकाणी शिल्लक असलेल्या जागेच्या खरेदी–विक्री व्यवहारांवर तात्पुरती स्थगिती घालण्यात आली आहे. तसेच, नवीन लेआउट विकसित करणे आणि नोंदणी प्रक्रियेवरही बंदी घालण्यात आली आहे.

मंत्री श्री. बावनकुळे यांनी सांगितले, या जमिनींवर उभारलेल्या घरांना सरकार संरक्षण देईल. या प्रकरणात जर कोणी फसवणूक केली असेल, तर त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. ज्या नागरिकांनी या ठिकाणी घर विकत घेत घेतले आहे त्यांना कोणताही त्रास होणार नाही. फसवणूक करणाऱ्यांवर महसूल कायदा, पोलिस कायदा आणि अन्य संबंधित कायद्यांनुसार कठोर कारवाई केली जाईल, असेही महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी सांगितले.

## पुणे शहरात कौशल्य विकास केंद्र उभारणार – मंत्री उदय सामंत

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** पुणे शहरात शिक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी येत असतात. तसेच रोजगारासाठी येणाऱ्या तरुण – तरुणींची संख्याही मोठी आहे. पुणे शहरात विद्यार्थी, तरुणांच्या कौशल्य विकासात वाढ करण्यासाठी सी.एस. आर (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्स बिलीटी) अंतर्गत कौशल्य विकास केंद्र उभारण्यात येणार असल्याची घोषणा मंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात केली.

पुणे महापालिकेत समाविष्ट गावांतील समस्यांबाबत सदस्य विजय शिवतारे यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली. या लक्षेवधी सूचनेच्या चर्चेत सदस्य भीमराव तापकीर सहभागी झाले होते.

याबाबत उत्तरात मंत्री सामंत म्हणाले, पुणे महापालिकेतील फुरसुंगी आणि उरुळी देवाची गावे वगळून या दोन्ही गावांसाठी नगरपरिषद स्थापन करण्यात आली आहे. लोकसंख्येचा विचार करून ही नगरपरिषद ' अ ' वर्ग दर्जाची करण्याबाबत कोकण विभागीय आयुक्त यांचा अहवाल स्वीकारून दर्जा देण्यात येईल. या नगरपरिषदेला सेवांचे हस्तांतरण पुणे महापालिकेकडून होईपर्यंत पायाभूत सोयीसुविधांची कामे सुरू राहतील.

# कुष्ठ रुग्णांसाठी कार्यरत स्वयंसेवी संस्थांच्या अनुदानात वाढ करणार

## सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात कुष्ठ रुग्णांच्या रुग्णालयीन सेवा व पुनर्वसनासाठी स्वयंसेवी संस्था कार्यरत आहे. या स्वयंसेवी संस्थांना शासन प्रति महिना प्रति कुष्ठरुग्ण याप्रमाणे अनुदान देत असते. रुग्णालय तत्वावरील स्वयंसेवी संस्थांना प्रति कुष्ठरुग्ण दरमहा ६ हजार २०० रुपये आणि पुनर्वसन तत्वावरील स्वयंसेवी संस्थांना दरमहा प्रती कुष्ठरुग्ण रुपये ६ हजार इतके अनुदान शासनाकडून वाढविण्यात येणार आहे, अशी माहिती सार्वजनिक व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

राज्यात कुष्ठरोग निर्मूलनबाबत सदस्य डॉ नितीन राऊत यांनी प्रश्न उपस्थित केला होता या प्रश्नाच्या चर्चेमध्ये सदस्य मनीषा चौधरी, सुलभा खोडके यांनीही सहभाग घेतला.

या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, सध्या रुग्णालय तत्त्वावरील संस्थांना दरमहा प्रती कुष्ठ रुग्ण रुपये २ हजार २०० रुपये आणि पुनर्वसन तत्त्वावरील स्वयंसेवी संस्थांना दरमहा प्रति कुष्ठरुग्ण रुपये २ हजार इतके अनुदान शासनाकडून देण्यात येते. यामध्ये वाढ करण्यात येत आहे. कुष्ठरोग निर्मूलन मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी तसेच कुष्ठ रुग्णांच्या रुग्णसेवेसाठी या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या बैठकीचे आयोजनही करण्यात येईल. या बैठकीत संस्थांच्या अडचणी, मोहिमेतील उणिवा आणि सूचना जाणून घेण्यात येतील.



राज्यात अती जोखमीच्या लोकसंख्येत कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र अर्थात कुसुम ही मोहीम सन २०२३ पासून दरवर्षी राबविण्यात येत आहे. कुष्ठरोगाविषयी समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियानही राबविण्यात येते. राज्यातील आरोग्य विभागाच्या विविध कल्याणकारी योजना, उपक्रम यांची जनजागृती मोठ्या प्रमाणावर करण्यात येणार आहे. राज्यातील कुष्ठरोगाचे सर्वे क्षण वाढल्यामुळेच रुग्णसंख्या वाढलेली दिसून येत आहे. या सर्व रुग्णांना बहुविध औषधोपचाराखाली आणण्यात आले आहे, असेही सार्वजनिक आरोग्य मंत्री अबिटकर यांनी सांगितले.

# समृद्ध ऐतिहासिक स्थळांच्या संरक्षणासाठी प्रत्येक नांदेडकरांनी पुढे यावे : जिल्हाधिकारी कर्डिले

**दैनिक आपला विदर्भ**

**नांदेड/प्रतिनिधी :** शिलालेखापासून किल्लयापर्यंत आणि मंदिरांपासून कलात्मक बावडीपर्यंत नांदेडकडे शतकानुशतकाचा इतिहास पर्यटनाच्या स्वरुपात उपलब्ध आहे. या वारस्याच्या रक्षणासाठी गावागावांमध्ये जनजागृती व्हावी तसेच यासाठी शासनासोबतच राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजनेलाही जिल्ह्यामध्ये प्रतिसाद मिळावा अशी अपेक्षा आज जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी व्यक्त केली.



महावारसा समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये झाली. या बैठकीला जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, उपवनसंरक्षक केशव वाबळे, पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक अमोल गोटे, रूक्मिण रोडगे, डॉ. कामाजी डक, वास्तुविशारद स्मिता कासार पाटील हे वरिष्ठ अधिकारी तसेच जिल्हा वारसा समितीचे सदस्य उपस्थित होते.

यावेळी जिल्ह्यातील प्रमुख स्मारकांच्या संदर्भात सुरू असलेल्या व प्रस्तावित असलेल्या कामांबाबत चर्चा झाली. प्रामुख्याने होट्टल येथील प्राचीन शिल्प मंदिर, माहूर येथील किल्ला, कंधार येथील किल्ला या ठिकाणच्या पर्यटकांच्या सोई–सुविधांवर चर्चा झाली.

या बैठकीमध्ये नांदेड जिल्ह्यासाठी समिती गठन करण्याचा निर्णय घेण्यात आला. नंदगिरी किल्ला, बिलोली मशीद येथील अतिक्रमन हाटविणे, होट्टल येथे महोत्सव आयोजित करणे, नांदेड जिल्ह्यातील प्रस्तावित स्मारकांना राज्य संरक्षित करणे, निजाम शासनाकडून पुरातत्व विभागाकडे आलेल्या स्मारकाची मालकी सात/बारावर संचालक पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाचा उल्लेख करणे, असंरक्षित स्मारकांची यादी अद्यावत करणे, भोकर येथील यादव कालीन शिवमंदिरासमोरील सभामंडप जमीनदोस्त झाल्याबाबत कार्यवाही करणे आदी विविध विषयांवर यावेळी चर्चा झाली.

समिती सदस्य सुरेश जोंधळे यांनी प्राचिन बांधकामाच्या सभोवताली पर्यावरण जपण्याबाबत सूचना मांडली. तर इतिहास तज्ज्ञ डॉ. अरविंद सोनटक्के यांनी आपल्या वारसा जतनामध्ये हयगय होऊ नये तसेच प्राचिन वास्तूला हानी पोहोचवणाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी केली. यावेळी किल्लेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी नंदगिरी किल्ल्या संदर्भातील समस्यांची मांडणी केली. यावेळी प्रामुख्याने माहूर, कंधार येथील किल्ल्यांवरही चर्चा झाली. पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक अमोल गोटे यांनी जिल्ह्यात सुरू असलेल्या कामकाजाचा आढावा सादर केला.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### पोलिसांनी दिली भैरी देवाच्या पालखीला सलामी



दैनिक आपला विदर्भ

**रत्नागिरी/प्रतिनिधी :** रत्नागिरीच्या बारा वाड्यांचे ग्रामदैवत असलेल्या भैरी देवीच्या पालखीला ऐतिहासिक काळापासून सलामी देण्याची परंपरा आहे त्यानुसार यावर्षीही रंगपंचमीच्या दिवशी पोलिसांनी भैरी देवीच्या पालखीला सलामी दिली.

रत्नागिरीच्या बारा वाड्यांचे ग्रामदैवत असलेल्या भैरी देवाच्या पालखीला सशस्त्र सलमी देण्याची परंपरा आहे. बंदूकधारी पोलिस एलएलआर बंदुकीच्या सहाय्याने पालखीला मानवंदना देतात. चार बंदूकधारी पोलिसांनी पालखीला मानवंदना देण्याची ब्रिटिश काळापासून परंपरा चालत आली आहे. ही परंपरा रंगपंचमीच्या दुपारी रत्नागिरीत मिळते पहायला मिळली.पालखीला सलामी देण्याची ही परंपरा शिमगोत्सवात फक्त कोकणातच पहायला मिळते.

### सातारा जिल्हात बावधन गावात गावची 'बगाड' यात्रा सुरु



दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी :** साताऱ्यातल्या वाई तालुक्यातील प्रसिद्ध बावधन च्या बगाड यात्रेचा आजचा मुख्य दिवस आहे. आजच्या दिवशी बगाड्याला बगाडाला टाकलं जातं. या बगाड यात्रेला पाहण्यासाठी महाराष्ट्रातून लाखो भाविक बावधन गावात येत असतात. डोळ्याचे पारणे फेडणारी बावधन ची बगाडी यात्रा असते.महाराष्ट्रातील सर्वात मोठी बगाड यात्रा ही सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यातील बावधन मध्ये पार पडते...काशिनाथाच्या नावानं चांगभलं च्या जयघोषात बावधन च्या बगडाला सुरुवात झाली आहे.. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून या बगाडाची परंपरा चालत आले आहे याचे पुरावे बावधन च्या भैरवनाथाच्या मंदिरात सभामंडपावर ठोकलेल्या नवसेच्या नाले वरून ते लक्षात येतं.. हजारोंच्या संख्येत नागरिक या बघा यात्रेला हजेरी लावतात.. बगडाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे या बगाड्याच्या रथाला ओडण्यासाठी खिलार बैलांच्या जोड्या लागतात..

### महाराष्ट्रात जे चालू आहे त्यावर राज ठाकरे भाष्य करतील; मनसे नेते बाळा नांदगावकर यांची माहिती




दैनिक आपला विदर्भ


**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात जे काही चालू आहे त्यावर राज ठाकरे ७-८ दिवसात विषयावर भाष्य करतील, अशी माहिती मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, मध्यंतरी आमची वरळीत बैठक झाली. त्यावेळी राज ठाकरेंनी जाहीर केले होते की, आम्ही आमची एक महाराष्ट्र व्यापी रचना निर्माण करणार आहोत. त्याची पूर्ण तयारी झाली आहे. त्यात काय करणार आहोत याची माहिती ३० तारखेला सभेत देणार आहोत. महाराष्ट्रात चालू आहे त्या सर्व विषयावर ते भाष्य करतील.तसेच ७-८ दिवसात नागपूर मध्ये घडलेल्या विषयावर भाष्य करतील.असे राजकारण महाराष्ट्रात कधीच पाहिले नाही.पक्षाचे काही धोरण आहे ते ३० तारखेला गुढीपाडवा निमिती स्पष्ट केले जाईल. असे मत यावेळी मनसेचे नेते बाळा नांदगावकर यांनी व्यक्त केले.

# भंडारा जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नुरुल हसन यांचे भंडारा वासियांना आवाहन व निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**भंडारा/जिल्हा प्रतिनिधी :** भंडारा जिल्ह्यातील व शहरातील सर्व नागरिकांना जिल्हा पोलीस अधीक्षक नरूल हसन यांनी भंडारा वासियांना आवाहन करण्यात येत आहे. नागपूर शहरात घडलेल्या घटनेच्या पार्श्र्वभूमीवर कोणत्याही प्रकारची समाजाच्या भावना दुखावणारी किंवा दोन धर्मामध्ये तेढ पसरविणारे आक्षेपार्ह, मेसेज, इमेजेस, व्हिडिओज, घटनेची व माहितीची शहानिशा न करता व्हाट्सअप, फेसबुक, ट्विटर इंस्टाग्राम व इतर सोशल मीडिया माध्यमावर भावना दुखवणारी पोस्ट प्रसारित करू नये . किंवा खोट्या प्रकारची अफवा पसरवू नये अशा प्रकारच्या कोणत्याही पोस्टमुळे दोन व्यक्ती, किंवा समाज, धर्म,पंथ अशांच्या भावना दुखावून समाजात तनाव निर्माण कोणतीही अनुचित घटना घडल्यात सदर पोस्ट करणाऱ्या इसमास गुन्हा करण्यास प्रवृत्त केल्याचे समजून त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

भंडारा जिल्ह्यात सर्व ठिकाणी पोलिसांचे चोख बंदोबस्त नेमण्यात आलेला असून सर्व पोलीस दल सतर्क आहे. तसेच सोशल मीडिया मॉनिटरिंग, सेल ,स्थापन करण्यात आले असून सर्व व्हाट्सअप फेसबुक व्टिट इंस्टाग्राम व इतर सोशल मीडिया माध्यमावर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे. याद्वारे भंडारा जिल्ह्यातील सर्व नागरिकांना निर्देश देण्यात येत आहे की नागपूर शहरातील झालेल्या घटनेच्या संदर्भाने खोटे मेसेज व अपवाद सोशल मीडियावर पसरविण्यात तसेच दोन समाजामध्ये तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट वायरल करणाऱ्या व संबंधित ग्रुप डमिन यांना जबाबदार धरण्यात येईल. असे कृत करणाऱ्यास महाराष्ट्र पोलीस कायदा तसेच भारतीय न्याय संहिता प्रमाणे कारवाई करण्यात येईल तरी सर्व व्हाट्सअप डमिन यांना सुचित करण्यात येते. आपण सर्वांनी सहयोग करून भंडारा जिल्ह्यात शांतता व सामाजिक सलोखा राखण्यासाठी पोलीस दलास सहकार्य करावे.



## गरिबांचा फ्रीज बाजारात दाखल



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** उन्हाची चाहूल लागताच बाजारात शीतपेय, कुलर दुकाने फुलले आहेत. यासोबतच उन्हातून आल्यानंतर तहान भागवण्यासाठी मठातील पाणी अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे गरिबांचे फ्रिज सध्या हात गाडीवर घेऊन गल्लोगल्ली विक्रिते फिरताना दिसत आहेत. माठ घेण्यासाठी बाजारात नागरिक दिसत आहेत. माठांची मागणी लक्षात घेता छत्रपती संभाजीनगर मध्ये गुजरात, मध्यप्रदेश यासह इतर राज्यातून माठ दाखल झाले आहेत. माठांची मागणी वाढली असली तरी भाव वाढल्याने व्यवसायावर काही अंशी परिणाम होत असल्याचे विक्रेते सांगतात.

## वर्षांनंतर सलमान खान- ऐश्वर्या रायच्या ब्रेकअपचं खरं कारण आलं समोर!

***मुंबई/प्रतिनिधी :*** *बॉलिवूडमधील एकेकाळी सलमान खान आणि ऐश्वर्या राय यांच्या नात्याबद्दल कायम चर्चा असायच्या.मात्र, त्यांचे नाते फारकाळ टिकले नाही. अखेर वर्षांनंतर सलमान खान आणि ऐश्वर्या राय यांच्या ब्रेकअपबद्दल मोठा खुलासा झाला आहे.*

*वरिष्ठ पत्रकार आणि लेखक हानिफ झवेरी यांनी या ब्रेकअपच्या कारणांबद्दल आणि ऐश्वर्याच्या विवेक ओबेरॉय सोबतच्या नात्याबद्दल माहिती दिली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, सलमान आणि ऐश्वर्या एकमेकांच्या प्रेमात खोलवर होते, मात्र काही कारणांमुळे त्यांच्या नात्यात कटुता निर्माण झाली आणि ते वेगळे झाले.*

*सलमान-ऐश्र्वर्याला नात्याला पुढे न्यायचं होतं, पण*

*वरिष्ठ पत्रकार आणि लेखक हानिफ झवेरी यांनी दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, सलमान आणि ऐश्वर्या यांच्यातील प्रेम खूप गंभीर होते आणि दोघेही त्याला पुढे नेण्याचा विचार करत होते. मात्र, त्यावेळी सलमानचे नाव इतर अभिनेत्रींसोबतही जोडले जात होते. सोमी अली आणि संगीता बिजलानी यांच्यासोबत असलेल्या अफवा ऐश्वर्याच्या पालकांना पसंत नव्हत्या. त्यांना असे वाटत होते की सलमान फक्त फ्लर्ट करत आहे आणि त्यांच्या मुलीसोबत गंभीर नाही.*

*यानंतर आणखी एक मोठे कारण समोर आले की, सलमानला ऐश्वर्याशी लग्न करायचे होते, मात्र त्या काळात ऐश्वर्या करिअरवर लक्ष केंद्रित करू इच्छित होती आणि लग्नासाठी तयार नव्हती. या कारणांमुळे दोघांमध्ये मतभेद वाढले. सलमानने दारूच्या नशेत ऐश्वर्याच्या इमारतीत जाऊन गोंधळ घातला, ज्यामुळे परिस्थिती आणखी बिघडली आणि अखेर ऐश्वर्याने त्याच्याशी संबंध तोडण्याचा निर्णय घेतला.*

*सलमानपासून वेगळे झाल्यानंतर ऐश्वर्याचे नाव विवेक ओबेरॉयसोबत जोडले गेले. मात्र, हानिफ झवेरी यांनी सांगितले की हे नाते प्रत्यक्षात अस्तित्वातच नव्हते. ऐश्र्वर्याला फ्रॅक्चर झाल्यामुळे विवेक तिची मदत करत होता. तो तिला रुग्णालयात घेऊन जात होता आणि व्हीलचेअरवर फिरवत होता. यामुळे असे वाटले की दोघांमध्ये काही तरी विशेष आहे, पण प्रत्यक्षात तसे काहीच नव्हते.*

## शासकीय रुग्णालयांतील औषध तुटवड्याच्या तपासणीसाठी लोकप्रतिनिधींची समिती - मंत्री मुश्रीफ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील वैद्यकीय शिक्षण विभागाच्या शासकीय रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा किती आहे, याचा तपशीलवार अहवाल तयार करण्यासाठी लोकप्रतिनिधींची समिती गठीत करण्यात येईल. ही समिती १५ दिवसांत अहवाल सादर करेल, असे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

याबाबत सदस्य काशिनाथ दाते यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी सदस्य अजय चौधरी, योगेश सागर, अमित देशमुख, नाना पटोले, देवयानी फरांदे, रोहित पवार यांनीही उपप्रश्न उपस्थित केला.



मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण विभागातील रुग्णालयांना लागणारी औषधे व यंत्रसामग्री खरेदी २०१७ - १८ या वर्षापासून शासकीय रुग्णालयात हाफकीन संस्थेमार्फत करण्यात येत होती. हाफकीनच्या माध्यमातून होणाऱ्या औषध खरेदीबाबत अनेक तक्रारी आल्यामुळे सन २०२३ पासून वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली असून या प्राधिकरणाकडून औषधे व यंत्रसामग्री खरेदी केली जात आहे.

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने २०१७-१८ ते २०२२-२३ या कालावधीत हाफकिन महामंडळाला २६५३.७७ कोटी निधी मंजूर केला. त्यापैकी रु. १३१८.२४ कोटी खर्च झाले तर ९५७.१२ कोटी परत करण्यात आले. उर्वरित ३७८.४० कोटींपैकी २९६.०० कोटी प्रलंबित देयके तसेच सुरू असलेल्या खरेदीसाठी वापरण्यात येणार आहेत, असे मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले.

## नंदुरबार जिल्ह्यातील शहादा येथे औद्योगिक वसाहत स्थापन करणार- उद्योग मंत्री उदय सामंत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** नंदुरबार जिल्ह्यातील शहादा येथे नवीन औद्योगिक वसाहत स्थापन करण्यात येणार आहे. त्यासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शहादा येथे औद्योगिक वसाहत स्थापन करून या भागात औद्योगिक गुंतवणूक व उद्योग सुरू करण्यासाठी शासन सकारात्मक आहे, अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली.



नंदुरबार जिल्ह्यातील औद्योगीकरणा बाबत सदस्य राजेश पाडवी यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. या सूचनेच्या चर्चेत सदस्य योगेश सागर यांनी सहभाग घेतला.

मंत्री श्री. सामंत म्हणाले, नंदुरबार जिल्ह्यात औद्योगीकरण वाढवून तेथील स्थलांतर कमी करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. शेजारच्या गुजरात राज्यातील सुरत येथील वस्त्र उद्योग नंदुरबार जिल्ह्यात येत आहे. नंदुरबार जिल्ह्यात एक हजार कोटी रुपयांची गुंतवणूक असलेले वस्त्रोद्योगाचे प्रकल्प आले आहेत. त्यामुळे नंदुरबार जिल्ह्यात औद्योगीकरण निश्र्चितच वाढणार आहे. नंदुरबार जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना थेट औद्योगिक प्रशिक्षण केंद्राशी जोडून त्यांचा कौशल्य विकास करून प्रशिक्षणही देण्यात येणार आहे. याचा संपूर्ण खर्च महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ करणार आहे. राज्यात अशाप्रकारचा हा पहिलाच प्रयत्न आहे. गुजरात राज्यातील सुरतमधील उद्योग नंदूरबार जिल्ह्यात आणण्यासाठी तज्ज्ञांची समिती गठित करण्यात येईल. या समितीच्या माध्यमातून उद्योग वाढीसाठी प्रयत्न करण्यात येतील. तसेच शहादा येथील औद्योगिक वसाहतीसाठी आवश्यकता असल्यास बैठकीचे आयोजन करण्यात येईल, असेही मंत्री सामंत यांनी सांगितले.

# बुलढाण्यात शुक्रवारी रोजगार मेळावा व मार्गदर्शन सत्र

दैनिक आपला विदर्भ

**नामांकीत कंपन्यात नोकरीची संधी, थेट मुलाखतीने निवड**
**विदेशातील रोजगार संधी व पीएम इंटर्नशिपविषयी मार्गदर्शन मिळणार**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना नोकरीच्या संधी उपलब्ध होण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि केंद्र शासनाच्या श्रम आणि रोजगार मंत्रालयाच्या नॅशनल करियर सर्विस यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगार मेळावा आणि मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शुक्रवारी दि.२१ मार्च रोजी पंकज लद्दड इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट स्टडीज, येळगाव, बुलढाणा येथे होणार आहे.

या मेळाव्यात जस्ट डायल लिमिटेड, पुणे; भारस्कर सर्विसेस, पुणे; टॅलेंट सेतु, पुणे; स्वतंत्र मायक्रो फायनान्स; क्रेडिट ॲक्सेस ग्रामीण कूटा यांसारख्या ८ पेक्षा अधिक नामांकित कंपन्यांनी ४७० पेक्षा अधिक रिक्त पदे अधिसूचित केलेली आहे. या मेळाव्यात उमेदवारांच्या मुलाखती घेऊन त्यांची प्राथमिक निवड केली जाईल. तसेच, केंद्र शासनाच्या पीएम इंटर्नशिप योजना आणि महाराष्ट्र शासनाच्या सहभागातून इस्राइलमध्ये उपलब्ध रोजगार संधींबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या https://mahaswayam.gov.in व श्रम आणि रोजगार मंत्रालय भरात सरकार अंतर्गत मॉडेल करीयर सेंटरच्या https://www.ncs.gov.in या संकेतस्थळावर नाव नोंदणी असलेल्या अथवा नसलेल्या १० वी, १२ वी, आय टी आय, पदवीधर पुरुष / महिला उमेदवारांनी रोजगार मेळाव्याच्या ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहून सहभागी होऊन रोजगार प्राप्त करण्याची संधी उपलब्ध करून घ्यावी. या रोजगार मेळाव्यात सहभागी होण्याकरीता कार्यालयात येण्याची गरज नाही.




तसेच या रोजगार मेळाव्यात पात्र, गरजु व नौकरी इच्छुक स्त्री-पुरुष उमेदवार आपल्या शैक्षणिक पात्रतेच्या आधारे एकापेक्षा जास्त पदांकरीता सुध्दा अर्ज करु शकतात. अर्जदारांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह स्वखर्चाने उपस्थित राहुन आपली नाव नोंदणी करावी आणि उपस्थित कंपन्यांच्या प्रतिनीधीसमवेत मुलाखत द्यावी.

बुलढाणा जिल्ह्यातील जास्तीत जास्त उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा. याबाबत काही अडचण आल्यास कार्यालयाचा दूरध्वनी ०७२६२२४२३४२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करीयर सेंटर बुलढाणाचे सहायक आयुक्त ग. प्र. बिटोडे यांनी केले आहे.

# लोणार येथील वन जमिनीवरील आगीची सीआयडी मार्फत चौकशी करा

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** जगप्रसिद्ध लोणार सरोवर येथे तब्बल दोनशे एकर वन विभागाच्या जमिनीला आग लावून लाख मोलाची वनसंपदा नष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे या वनजमिनीवरील आगीची सीआयडीमार्फत चौकशी करून जोशीला कठोर शासन करावे, अशी मागणी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नगर विकास मंत्री एकनाथराव शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेख बावनकुळे, वन मंत्री गणेश नाईक यांनी यांना निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, जगप्रसिद्ध खाऱ्या पाण्याचे सरोवर म्हणून प्रसिद्ध असलेल्या लोणार येथील दुर्गा टेकडी परिसरात जवळपास २०० एकर वन जमीनीला १२ मार्च रोजी दुपारी १२ वाजता आग लावण्यात आली आहे. या आगीत लाखमोलाची





## माजी मंत्री सुबोध सावजी यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

वनसंपदा नष्ट झालेली आहे. सदर लावलेल्या आगीची चौकशी सी. आय. डी. यंत्रणे मार्फत कमीतकमी कालावधीत चौकशी करण्यात यावी. ही आग ५० लाख रुपयाच्या देवाण घेवाण करण्याच्या आर्थिक व्यवहारातून व्यवहारातून लावण्यात आली आहे, अशी चर्चा जनतेत होत आहे. दुर्गा टेकडीवर ३० ते ३५ वर्ष पुंडलिक मापारी यांचे रात्रंदिवस वास्तव होते.या कालावधीत या वन जमीनी वरिल एक इंच जमीन जळाली नाही. या शासकीय वन जमीनीवर अतिक्रमणही झाले नाही. पुंडलिक मापारी यांच्या निधनानंतर ही शासकीय वन जमीन कशी जळते, हा प्रश्न निर्माण झाला आहे. या करोडो रुपयांच्या वन जमीन मालमत्तेवर जिल्ह्यातील अनेकांना अतिक्रमण करावयाचे आहे.असे बोलल्या जात आहे. ही शासकीय वन जमीन अतिक्रमीत करण्याचे हेतूनेच १२ मार्च रोजी दुपारी १२ वाजता आग लावण्यात आली आहे. आगेची माहिती मिळाल्यावर बुलढाणा जिल्हा जिल्हाधिकारी घटना पाहून गेले. यानंतर कोणतीही चौकशी झाली नाही. सर्व लोणार वासीयांच्या वतीनेही मागणी आहे.की, या प्रकरणी लवकरात लवकर सी.आय.डी. तपास करून शासकीय मालमत्तेवर अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घ्यावी. लाख मोलाची वनसंपदा नष्ट करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी मुख्यमंत्री यांना निवेदनाद्वारे केली आहे.

## कल्याण येथील विशाल गवळीवरील गुन्हा दाखल प्रकरणी पोलीस विभागाकडून हलगर्जीपणा नाही - गृह राज्यमंत्री योगेश कदम

**मुंबई/प्रतिनिधी :** ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथील आरोपी विशाल गवळीवर विनयभंगाचे व इतर असे एकूण नऊ गुन्हे कोळसेवाडी पोलीस स्टेशन येथे दाखल आहेत. या गुन्ह्यांमध्ये आरोपी विशाल गवळी व अन्य पाच ते सहा गुन्हेगारांनी मानसिक रुग्ण असल्याच्या प्रमाणपत्राआधारे विनयभंग, छेडछाड अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये जामीन मिळविल्याचे आढळून आलेले नाही. तसेच या प्रकरणी पोलीस विभागाने हलगर्जीपणा केलेला नाही. त्यामुळे त्याबाबतची चौकशी करण्याची आवश्यकता नसल्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधान परिषदेत सांगितले.

## मलकापूरमध्ये स्टेट बँकेची नवीन फॉरेक्स शाखा

### उद्योजक, निर्यातदारांना दिलासा ; अकोल्याच्या चकरा थांबणार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील निर्यातदार आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) विकासाला चालना देण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाने मलकापूरच्या मुख्य शाखेत नवीन फॉरेक्स शाखा सुरु केली आहे. या शाखेचे मंगळवारी उद्घाटन झाले असून या नवीन शाखेमुळे आता जिल्ह्यातील उद्योजक, निर्यातदारांना फॉरेक्स सेवांसाठी अकोला येथे जाण्याची आवश्यकता राहणार नाही.



या विशेष फॉरेक्स शाखेसाठी जिल्हाधिकारी आणि जिल्हास्तरीय निर्यात प्रचालन समितीचे अध्यक्ष डॉ. किरण पाटील यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. याशिवाय, जिल्हा उद्योग केंद्र बुलढाणा आणि एसबीआयच्या बुलढाणा क्षेत्रीय कार्यालयाचे प्रबंधक मोहंमद इकबाल यांनीही योगदान दिले. त्यांच्या सहकार्यामुळे स्थानिक व्यावसायिकांना विशेष फॉरेक्स सेवांचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

**निर्यातीत बुलढाणा जिल्हा अव्वल**

गेल्या तीन वर्षांत अमरावती विभागात बुलढाणा जिल्हा निर्यातीमध्ये अव्वल राहिला आहे. यंदाच्या चालू आर्थिक वर्षात बुलढाणा जिल्ह्यातून ४६५ कोटी रुपयांवर उत्पादनांची निर्यात झाली आहे. या नवीन फॉरेक्स शाखेच्या स्थापनेमुळे जिल्ह्यातील आर्थिक विकासाला आणखी चालना मिळेल, असा विश्र्वास व्यक्त करण्यात आला आहे.

**'या' सेवा मिळणार**

नवीन फॉरेक्स शाखेत परकीय चलन व्यवहार, व्यापार वित्त आणि निर्यात-आयात व्यवहारांसाठी सल्लामसलत यांसारख्या सेवा पुरवण्यात येणार आहेत. जागतिक व्यापार सुलभ करण्यासाठी आणि स्थानिक उद्योगांना अधिक सक्षम करण्यासाठी एसबीआयने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी बुलढाणा जिल्ह्यातील सर्व निर्यातदार आणि एमएसएमई प्रतिनिधींनी या विशेष सेवांचा लाभ घेण्यासाठी मलकापूर मुख्य शाखेला भेट देण्याचे आवाहन केले आहे. ही शाखा तज्ज्ञ कर्मचारी आणि आधुनिक सुविधांनी सुसज्ज असून जागतिक व्यापाराच्या वाढत्या मागण्या पूर्ण करण्यासाठी सक्षम असल्याचे त्यांनी सांगितले.

नवीन फॉरेक्स शाखेच्या स्थापनेमुळे बुलढाणा जिल्ह्यातील व्यावसायिकांसाठी जागतिक बाजारपेठेत स्थान निर्माण करण्याची संधी उपलब्ध होणार असून स्थानिक उद्योगांना अधिक स्पर्धात्मक बनवण्यात मदत होणार आहे. याविषयी अधिक माहितीसाठी आणि चौकशीसाठी एसबीआयच्या मलकापूर मुख्य शाखेला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## उन्हाळी भुईमुगावर बुरशीचा धोका; शेतकऱ्यांनो आधीच घ्या काळजी! कृषी विभागाचे आवाहन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर उन्हाळी भुईमुगाची पेरणी झाली असून, काही ठिकाणी पीक बहरत आहे. मात्र, हवामानातील बदल, जमिनीत जास्त ओलावा आणि तापमानातील चढ-उतार यामुळे भुईमुगावर बुरशींजन्य रोगांचा संभाव्य धोका वाढला आहे. त्यामुळे पांढरी बुरशी, मूळकूज आणि खोडकूज होण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी वेळीच काळजी घेण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

**भुईमुग पिकातील सद्यस्थिती:**

प्रस्तावितपेरणीक्षेत्र:४,७७० हेक्टर आतापर्यंत पेरणी झालेलं क्षेत्र: ३,४४६ हेक्टर

**बुरशीजन्य रोगांची लक्षणे:**

सुरुवातीला झाडांची पाने फिकट पिवळी पडू लागतात. त्यानंतर झाड हळूहळू सुकू लागते आणि उत्पादनावर परिणाम होतो. जमिनीत जास्त ओलावा राहिल्यास मूळ आणि खोड कुजण्याचा धोका वाढतो.

**बुरशीजन्य रोग टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय:**

**बीज प्रक्रिया:** रोग प्रतिबंधात्मक उपाययोजना करतांना ट्रायकोडर्मा व्हिरीडी (४ ग्रॅम/प्रति किलो बियाणे), कार्बोझीन ३७.५% + थायरम ३७.५% डब्ल्यु पी किंवा कार्बेन्डाझिम १२% + मॅन्कोझेब ६३% पी (३ ग्रॅम/प्रति किलो बियाणे) या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी.

**मातीची योग्य निगा:** पेरणीपूर्वी रायझोबियम आणि स्फुरद विरघळणारे जिवाणू संवर्धन प्रत्येकी २५० ग्रॅम प्रमाणात १०-१५ किलो बियाण्यास लावावे.

**जमिनीची योग्य निगा ठेवा :**

पेरणी करतांना चांगला निचरा होईल याची खात्री करा. गरजेपेक्षा जास्त पाणी दिल्यास मूळकूज आणि खोडकूज वाढू शकते. त्यामुळे जास्त पाणी टाळा.

**पिकाचे नियमित निरीक्षण:**

झाडांची पाने पिवळी पडतात का, खोडाजवळ पांढरी बुरशी दिसते का याकडे लक्ष द्या. झाडांची वाढ कमी होत असल्यास त्वरित कृषी तज्ज्ञांचा सल्ला घ्या. भुईमुगावर सध्या बुरशीजन्य रोग दिसत नसले तरी हवामान बदलांचा पीकावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे पीक सुरक्षित राहण्यासाठी शेतकऱ्यांनी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

## वैद्यकीय महाविद्याल कायम ठेवण्यासाठी 'रास्तारोको'आंदोलन

### वाशीम-मालेगाव मार्गावर काहीकाळ वाहतूक ठप्प

दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी :** मालेगाव तालुक्यातील चिवरा येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर केले होते. मात्र, येथील महाविद्यालयाची जागा बदलून वाशीम येथे महाविद्यालय करण्यास प्रारंभ करण्यात आल्यामुळे संतप्त झालेल्या चिवरावासीयांनी वाशीम-मालेगाव मार्गावर डॉ.राधेश्यााम क्षीरसागर यांच्या नेतृत्वात १९ मार्च रोजी 'रास्तारोको' आंदोलन करून वैद्यकीय महाविद्यालय चिवरा येथेच कायम ठेवावे, आशी मागणी केली.

चिवरा येथील शासकीय जमिनीवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करण्यात आले होते. या शासकीय महाविद्यालयाची क्षमता ही १०० विद्यार्थ्यांसह तब्बल ४३० खाटांची आहे. या महाविद्यालयाच्या उभारणीसाठी चिवरा येथील जागा निशित करण्यात आली होती. वैद्यकीय महाविद्यालय झाल्यास ग्रामीण, अविकसित परिसराचा विकास होण्यास मदत होणार आहे, अशी आशा चिवरा ग्रामस्थांना निर्माण झाली होती.

मात्र, काही राजकारणी व धनाड्यांनी प्रशासनावर दबाव आणून चिवरा येथील वैद्यकीय महाविद्यालय वाशीम येथे हलविले आहे. चिवरा येथील तब्बल ७७ एकर शासकीय जमिन शासनाला विन्नामूल्य उपलब्ध होणार होती. तसेच प्रशस्त असलेल्या व




सर्वांगीण सोयी-सुविधेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची तब्बल ७७ एकर जागा व पाण्याची पुरेपूर सुविधा असतानाही केवळ राजकीय पटशुळातून येथील मंजूर वैद्यकीय महाविद्यायल वाशीम पळविण्यात आले आहे. असा आरोप आंदोलनकर्त्यांनी करीत तीव्र रोष व्यक्त करून मंजूर वैद्यकीय महाविद्यालय हे चिवरा येथेच कायम ठेवावे, अशी मागणी केली.

तसेच यासाठी रिसोडचे आ. अमित झनक यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले होते. तसेच पावसाळी अधिवेशनात चिवरा येथील जागेवरच वैद्यकीय महाविद्यालय करावे अशी मागणी सभागृहात केली. मात्र, तरीही येथील मंजूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय वाशीम येथे हलविण्यात आले आहे. त्यामुळे चिवरा वासीयांनी रोष व्यक्त करून शासकीय महाविद्यालय चिवरा येथेच कायम ठेवावे, यासाठी वाशीम- मालेगाव मार्गावर चिवरा व परिसरातील नागरिकांच्यावतीने डॉ. राधेश्याम क्षीरसागर यांच्या नेतृत्वात १९ मार्च रोजी रास्तारोको आंदोलन करण्यात आले. यावेळी मालेगाव पोलिसांच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## विविध वृत्त...

### वर्ध्यात महिलांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा



दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** विविध मागण्यांसाठी जिल्ह्यातील महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. संभाजी ब्रिगेडच्या नेतृत्वात जिल्ह्यातील महिलांनी काढला मोर्चा काढला होता. यावेळी महिलांच्या वतीने विविध मागणीचे निवेदन वर्धा जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, एकल महिलांना महिन्याला पाच हजार रुपये द्यावे, अंतोदय योजनेतून ३५ किलो धान्य द्यावे, एकल महिलांना पाच लाखाचे बिनव्याजी कर्ज देण्यात यावे, एकल महिलांना अंगणवाडी कर्मचारी व मदतीस यासाठी प्राधान्य द्यावे. यासह इतर मागण्या निकाली काढाव्या त अशी मागणी यावेळी करण्यात आली. महिलांनी मोर्चा मोठ्या संखेने सहभागी होत जोरदार घोषणाबाजी करत जिल्हाधिकारी कार्यालयात धडक दिली. यावेळी संभाजी ब्रिगेड राज्य संघटक तुषार उमाळे यांच्यासह इतर महिला व पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### घरकुल योजनांमधील लाभार्थ्यांना एकसारखा निधी देण्याबाबत निर्णय घेऊ - मंत्री इतर मागास बहुजन कल्याण अतुल सावे

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात राबविल्या जाणाऱ्या विविध घरकुल योजनांमधून लाभार्थ्यांना वेगवेगळे अनुदान दिले जाते. या योजनांना एकसारखे अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्याचे निर्देश विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले असून त्यानुसार मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल, असे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी विधानपरिषदेत सांगितले. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतील पात्र लाभार्थ्यांना अनुदान मिळण्याबाबत प्रश्र्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेदरम्यान सभापती प्रा. शिंदे यांनी निर्देश दिले. सदस्य सर्वश्री विक्रम काळे, एकनाथ खडसे, श्रीमती भावना गवळी यांनी या चर्चेत सहभाग घेतला.

इतर मागास बहुजन कल्याण मंत्री श्री. सावे म्हणाले, पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतील पात्र लाभार्थ्यांना सध्या चार टप्प्यांमध्ये १.२० लाख रुपये दिले जातात. ही रक्कम वाढवून देण्याबाबत तसेच या घरकुलांना पाच ब्रास वाळू देण्याबाबत देखील मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात येईल. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील ३२९ लाभार्थ्यांची नोंदणी आवास सॉफ्ट प्रणालीवर करण्यात आली असून त्यापैकी २४१ लाभार्थ्यांना मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. त्यापैकी १७१ लाभार्थ्यांना १५ हजार रुपयांचा पहिला हप्ता वितरित करण्यात आला असून उर्वरित लाभार्थ्यांची पी एफ एम एस प्रणालीवर बँक खाते पडताळणी प्राप्त होताच पहिला हप्ता वितरित करण्यात येईल, असे श्री. सावे यांनी यावेळी सांगितले.

### यवतमाळ जिल्ह्यात कॅल्शियम सिरपमध्ये 'फॉरेन पार्टीकल' आढळल्याप्रकरणी चौकशी करून कारवाई - सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** यवतमाळ जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात ग्लायसीकॅल बी - १२ या कॅल्शियमच्या सिलबंद सिरपमध्ये बुरशी आढळून आलेली दिसत नाही. तथापि फॉरेन पार्टिकल आढळून आले आहेत. या सिरपच्या बॉटलचा पुरवठा व वापर तात्काळ थांबवण्यात आला असून याप्रकरणी अन्न व औषध प्रशासन यांच्याकडून चौकशी करण्यात येत आहे. चौकशी अहवाल आल्यानंतर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असे सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

याबाबत सदस्य संजय देरेकर यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी सदस्य अनिल मांगुळकर,समीर कुणावार, रोहित पवार यांनीही उपप्रश्र्न उपस्थित केला.

आरोग्य मंत्री आबिटकर म्हणाले, यवतमाळ जिल्ह्यात काही प्राथमिक आरोग्य केंद्रात कॅल्शियम सिरपच्या बॉटल्समध्ये फॉरेन पार्टिकल आढळून आले असून त्यांचा पुरवठा व वापर तात्काळ थांबविण्यात आला आहे. सहायक आयुक्त, अन्न आणि औषध प्रशासन यांच्याकडून या औषधांचा नमूना चाचणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. याचा तपासणी अहवाल प्राप्त होताच नियमानुसार संबधिताविरुद्ध पुढील कारवाई करण्यात येईल. सद्यस्थितीत सर्व कॅल्शियम सिरपचा साठा जिल्हास्तरावर सीलबंद करून ठेवण्यात आला असल्याची माहिती आरोग्य मंत्री आबिटकर यांनी दिली.